पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.महिला व बालकल्याण समिती**

कार्यपत्रिका क्रमांक – ०४

**सभावृत्तांत**

दिनांक - **२६/०७/२०१९** वेळ - दुपारी **४.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा **शुक्रवार** दिनांक **२६/०७/२०१९** रोजी दुपारी **४.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.कुटे निर्मला संजय - सभापती**

२. मा.गोफणे अनुराधा देविदास

३. मा.मुंढे उषा अंकुश

४. मा.साधना अंकुश मळेकर

५. मा.कदम निकीता अर्जुन

६. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

या शिवाय मा.झगडे- सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव,मा.ऐवले- समाज विकास अधिकार हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक २) सभा आयोजनाबाबत.- मा.साधना मळेकर, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ३) महापालिका हद्दीत मनपाच्या वतीने स्त्रीसंसाधन केंद्र सक्षमा कक्ष उभारण्याबाबत.- मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ४) बालवडयांमधील शिशु व बालकांना स्वच्छता किट साहित्य देणेबाबत.- मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

विषय क्रमांक ५) शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर(एकत्रित युनिट) बसविणेबाबत. – मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव.

---------

खालील प्रमाणे सुचना मांडणेत आली.

सुचक – मा.उषा मुंढे अनुमोदक – मा.निकीता कदम

२६ जुलै हा कारगिल विजय दिवस असल्याने कारगिल युध्दात शहीद झालेल्या जवानांना आजच्या सभेमध्ये श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

(सदर सूचना सर्वानुमते मान्य झाली.)

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

दिनांक १२/०७/२०१९ व १८/०७/२०१९ रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक ०३) चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

ठराव क्रमांक – ४ विषय क्रमांक - ०१

दिनांक – २६/०७/२०१९ विभाग – नागरवस्ती विकास

सुचक : मा.अनुराधा गोफणे अनुमोदक : मा.निकीता कदम

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नावियो/२/कावि/१०३/२०१९ दि.१३/०२/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे –

महिला बचतगटांसाठी मिशन स्वावलंबन हा उपक्रम प्रस्तावात नमूद प्रमाणे राबविणेकामी महिला आर्थिक विकास महामंडळ, पुणे या शासन अंगीकृत संस्थेची मनपा अधिनियमाचे प्रकरण ५(२) (२) नुसार थेट पध्दतीने २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षाच्या कालावधीसाठी नियुक्ती करणे व या उपक्रमासाठी येणा-या र.रु.३,०३,४८,१५०/- (अक्षरी र.रु.तीन कोटी तीन लाख अठ्ठेचाळीस हजार एकशे पन्नास फक्त) चे खर्चास व सदरची रक्कम सदर संस्थेच्या मागणीनुसार टप्प्या – टप्प्या प्रमाणे अदा करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ०५ विषय क्रमांक - ०२

दिनांक – २६/०७/२०१९

सुचक : मा.साधना मळेकर अनुमोदक : मा.उषा मुंढे

संदर्भ : मा.साधना मळेकर, मा.उषा मुंढे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महिला व बालकल्याण समितीची पाक्षिक सभा यापुढे प्रत्येक महिन्याचे दुस-या व चौथ्या शुक्रवारी दुपारी ३.०० वा. आयोजित करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०६ विषय क्रमांक - ०३

दिनांक – २६/०७/२०१९

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

महाराष्ट्र राज्य महिला आयोग यांचेकडील दि.२६/०३/२०१८ चे पत्र सोबत जोडले आहे. त्यानुसार महापालिका हद्दीत महापालिकेच्या वतीने स्त्रीसंसाधन केंद्र(सक्षमा कक्ष) मनपाचे आठही क्षेत्रीय कार्यालयात उभारण्यास व त्यासाठी आवश्यक असणारी तरतुद करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०७ विषय क्रमांक – ०४

दिनांक – २६/०७/२०१९

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती ठराव क्र.१२ दि.१८/७/२०१७ अन्वये महापालिकेच्या बालवाडयांमधील शिशु/बालकांना स्वच्छता किट देणेस मान्यता देणेत आली होती. याबाबत सदर ठरावानुसार शिक्षण विभागाने कळविलेल्या पत्रातील माहितीनुसार २०८ बालवाडयांमधील ७२४९ बालकांना स्चच्छता किट पुरविण्यात आले होते. सदरचे प्रक्रीयेमध्ये संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेत आलेली होती. तसेच याबाबत वैद्यकिय विभागाकडून या स्वच्छता किट मधील साहित्य ठरविण्यात आले होते व सदर किटची खरेदी भांडार विभागाकडुन करणेत आलेली होती. व याकामी येणा-या खर्चाची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील तरतूदीमधुन करणेत आलेली होती. तरी सदरची योजना राबवावयाची असलेस सन २०१७-१८ वर्षाचे धर्तीवर महापालिकेच्या प्राथमिक शिक्षण विभागाकडील बालवाडयांमधील शिशु व बालकांना स्वच्छता किट साहित्य द्यावयाचे असलेने अद्ययावत आकडेवारीनुसार याबाबतची संपूर्ण प्रशासकीय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेस तसेच याबाबत वैद्यकीय विभागाकडून या स्वच्छता किटमधील साहित्य ठरविणेत यावे. व सदरची खरेदी विहित नियमानुसार भांडार विभागाकडुन करणेस विधानसभा निवडणूक आदर्श आचार संहिता लवकर लागणेची शक्यता असलेने त्याअनुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस व याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०१९-२० या अंदाज पत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजने अंतर्गत मदर तेरेसा- शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगीण विकासात्मक योजना या उपलेखा शिर्षावरील उपलब्ध तरतुदीमधुन करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच किट वाटपाचे कार्यक्रमाकरिता शिक्षण विभागाने सर्व सन्मा.पदाधिकारी व महिला बालकल्याण समिती सदस्य यांना निमंत्रित करण्यात यावे. यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ०८ विषय क्रमांक – ०५

दिनांक – २६/०७/२०१९

सुचक : मा.उषा मुंढे अनुमोदक : मा.साधना मळेकर

संदर्भ : मा.उषा मुंढे, मा.साधना मळेकर यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण योजनेअंतर्गत महापालिकेच्या शिक्षण विभागाकडील सर्व बालवाडया, सर्व प्राथमिक शाळा व सर्व माध्यमिक शाळांमध्ये वॉटर फिल्टर व वॉटर कुलर (एकत्रित युनिट) बसविणेबाबत योजना राबविणेचे असलेस सदर सर्व शाळांची अद्ययावत आकडेवारीनुसार सदरचे प्रक्रीयेमध्ये संपूर्ण प्रशासकिय कार्यवाही व साहित्य वाटप प्राथमिक शिक्षण विभागाकडून करणेस तसेच याबाबत वॉटर फिल्टर व वॉटर कुलर यांची तपासणी आयटीआय मार्फत करणेत येऊन व सदरची खरेदी विहित नियमानुसार भांडार विभागाकडून करणेस व विधानसभा निवडणूक आचारसंहिता लवकर लागणेची शक्यता असलेने त्यानुषंगाने तातडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. याकामीची तरतूद नागरवस्ती विकास योजना विभागाकडील सन २०१९-२० या अंदाजपत्रकामध्ये महिला व बालकल्याण योजने अंतर्गत मदर

तेरेसा–शिक्षण मंडळाकडील बालवाडीतील / प्राथमिक शाळेतील मुलांच्या सर्वांगीण विकासात्मक योजना या उपलेखाशिर्षावरील उपलब्ध तरतूदीमधून करणेस मान्यता देण्यात येत आहे. तसेच किट वाटपाचे कार्यक्रमाकरीता शिक्षण विभागाने सर्व सन्मा.पदाधिकारी व महिला बालकल्याण समिती सदस्य यांना निमंत्रित करण्यास मान्यता देणेत येत आहे.


सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

**( कुटे निर्मला संजय )**
**सभापती**
महिला व बालकल्याण समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/३/कावि/२५४/२०१९
दिनांक : २९/०७/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

विषय क्र.२ चे संलग्न

// स्त्रीशक्तिरतुल्या मता //
विजया रहाटकर (राज्यमंत्री दर्जा)
Vijaya Rahatkar (State Minister Rank)
chairperson.mscw@gmail.com

सत्यमेव जयते

अध्यक्षा
महाराष्ट्र राज्य महिला आयोग,
महाराष्ट्र राज्य

CHAIRPERSON
MAHARASHTRA STATE COMMISSION FOR WOMEN.
GOVERNMENT OF MAHARASHTRA

**क्रमांक :- ममआ-२०१८/मकें /का-०७/528**

**दिनांक :- २६/०३/२०१८**

**प्रति,**
**विभागीय आयुक्त,**
**विभागीय आयुक्त यांचे कार्यालय,**
**जिल्हा - (सर्व)**

**विषय - आपल्या अखत्यारितील सर्व स्थानिक राज संस्थामध्ये स्त्रीसंसाधन केंद्र (सक्षमा कक्ष) उभे करणायाबाबत.**

**महोदय,**

**महिलांच्या हितासाठी अविरत कार्यरत असलेली संवैधानिक संस्था म्हणून आपणा सर्वांना महाराष्ट्र राज्य महिला आयोगाची ओळख आहे. महिलांसाठी आयोग नेहमीच विविध उपक्रम आयोजित करते, विविध योजना राबवित असते. त्यासाठी राज्य सरकार, स्थानिक स्वराज संस्था यांच्यासह सामाजिक संस्थांनाही सोबत घेतले जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी राज्य शासन अविरत प्रयत्नशील आहे. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थांनीही आपला वाटा उचलला पाहिजे. त्यादृष्टिकोनातून स्थानिक स्वराज संस्थांनी सक्रिय सहभाग घेत स्त्री संसाधन केंद्र (जेंडर रिसोर्सेस सेंटर) उभारावे. त्यास 'सक्षमा कक्ष' असे नाव देता येऊ शकेल. बृहन्मुंबई महानगरपालिकेने उभारलेले सावित्रीबाई फुले संसाधन केंद्र हे सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी आदर्श उदाहरण आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या या केंद्राचे अनुकरण अन्य स्थानिक स्वराज्य संस्था करू शकतात. त्यासाठी राज्य महिला आयोग आपणास सहकार्य करेल. या केंद्राचा प्राथमिक आराखडा पुढीलप्रमाणे असेल.**

प्रपत्र '३'

**उद्दिष्ट**:- केंद्र व राज्य सरकारने वेळोवेळी महिलांच्या हितांसाठी विविध कायदे केले आहेत. त्यांच्यासाठी विविध कल्याणकारी योजना आखलेल्या आहेत. तरीही समाजातील महिलांचे प्रश्न अजूनही गुंतागुंतीचे आहेत. ते सोडविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनीही सामाजिक संस्थांच्या सहकार्याने पुढे येण्याची गरज आहे. त्यादृष्टिकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थानी आपापल्या शहरामध्ये स्त्री संसाधन केंद्र (सक्षमा कक्ष) उभारावे.

**कल्पना** :- १. महिलांच्या अडचणी सोडवून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करून, त्यांच्यातील कौशल्याला वाव देणारी एक सक्षम यंत्रणा असे हे केंद्र किंवा कक्ष असेल. या केंद्राच्या व्यवस्थापनात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या कर्मचारयांशिवाय अशासकीय स्वयंसेवी संस्थांचाही समावेश असावा.

२. कौटुंबिक हिंसाचार पीडित, कामाच्या ठिकाणी लैंगिक छळाला सामोरे जाणारया महिला यांच्यासाठी कायदेशीर सल्ला आणि समुपदेशन केंद्र असावे.

३. सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत मदत, सल्ला आणि समुपदेशन केंद्र.

४. केंद्र, राज्य व संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने महिलांसाठी आखलेल्या योजनांची माहिती देणारा कक्ष.

५. महिलांच्या कौशल्यासाठी, आर्थिक साक्षरता वाढविण्यासाठी, कायदेशीर जनजागृती करण्यासाठी प्रशिक्षण शिबिरांचे आयोजन करण्यासाठी सभागृह.

६. विवाहपूर्व मार्गदर्शन

७. स्वयंसेवी संस्थांना सवलतीच्या दरामध्ये कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देणे.

अपेक्षित आर्थिक तरतूद:-

हे केंद्र अथवा कक्ष स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आर्थिक सहकार्याशिवाय सक्षमरीत्या चालूच शकत नाही. आर्थिक पाठबळ ही या केंद्राच्या यशस्वितेची गुरूकिल्ली असेल. त्यादृष्टिकोनातून स्थानिक स्वराज्य संस्थांनी खालीलप्रमाणे दरवर्षी आर्थिक तरतूद केल्यास उत्तम ठरेल.

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| - | अ वर्ग | महापालिका | - | १ | कोटी | रूपये |
| - | ब वर्ग | महापालिका | - | ५० | लाख | रूपये |
| - | क वर्ग | महापालिका | - | ३५ | लाख | रूपये |
| - | ड वर्ग | महापालिका | - | २५ | लाख | रूपये |
| - | अ वर्ग | नगरपालिका | - | १० | लाख | रूपये |
| - | ब वर्ग | नगरपालिका | - | ५ | लाख | रूपये |
| - | क वर्ग | नगरपालिका | - | २ | लाख | रूपये |
| - | जिल्हा | परिषद | - | १५ | लाख | रूपये |
| - | पंचायत | समिती | - | ५ | लाख | रूपये |

हे प्राथमिक प्रारूप आहे. त्यामध्ये आणखी आवश्यक त्या सुधारणा करता येतील. पण हे केंद्र अस्तित्वात आल्यास किशोरवयीन मुली, अविवाहित माता, अडचणीत सापडलेल्या विवाहिता, एकल महिला, वृद्ध महिला अशा अनेक वयोगटातील, सामाजिक परिस्थितीतील महिलांसाठी शहराच्या पातळीवर एक भक्कम आधारस्तंभ उभे राहू शकते. आपण यात पुढाकार घ्यावा. त्यासाठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग आवश्यक सहकार्य करेल. आपल्या अखत्यारितील महापालिका, नगरपालिका, जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्यांना आपण या

संदर्भात अंमलबजावणीबाबत योग्य ते निर्देश द्यावेत. त्याचबरोबर संबधित स्थानिक स्वराज्य संस्थांना आपल्या आगामी वर्षाच्या (२०१८-१९) अर्थसंकल्पात सदर प्रस्तावित केंद्रासाठी आर्थिक तरतूद करण्याचे निर्देश द्यावेत. याबाबत आपणाकडून झालेल्या कार्यवाहीबाबत आयोगास अवगत करावे.कार्यवाहीचा अहवाल कृपया ई-मेलवर (chairperson.mscw@gmail.com) आणि आयोगाच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवावा.

धन्यवाद.

आपली स्नेहांकित

(विजया रहाटकर)

अध्यक्षा

NSKVC

सुचक - Amundre

अनुमोदक - S. A. Malekar